
स्वाध्याय माला

# भारतीय सण व उत्सव

सौ. कुमुदिनी रांगणेकर




म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. १५३८
BVBK-0401538

वैशाख

. अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २ .

या पुस्तिकांसाठी उपयोगात आणलेले **संदर्भ-ग्रंथ**

**मध्ययुगीन चरित्रकोश**--ले. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव; **नवनीत**--ले. नारायण बाळकृष्ण गोडबोले; **आर्यांचे सण**-- ले. 'ऋग्वेदी'; **जिवंत व्रतोत्सव**-- ले. काका कालेलकर; **संस्कृति समवाय** -- ले. वत्सला माटे. **स्वामी विवेकानंद**-- ले. त्र्यं. ग. वापट; **सहा थोर पुरुष**-- ले. न. र. फाटक

आणि अनेक लेखकांनी लिहिलेली चरित्रे.

## स्वा ध्या य मा ला

**संपादक-मंडळ**

डॉ. ग. श्री. खैर, एम्. ए., पीएच्. डी.
श्री. दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्. ए.
श्री. मु. ल. जोशी, एम्. ईडी., बी. एस्सी.
श्री. उ. र. सेवलेकर, बी. ए. (ऑ.), एम्. ईडी.

प्रकाशक : डॉ. गं. श्री. कोशे,
अ. वि. गृह प्रकाशनाकरिता,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २.

मुद्रक : दि. दा. गांगल,
लोकसंग्रह मुद्रणालय,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २.

आवृत्ती पहिली : १९५७
आवृत्ती दुसरी : १९६५

© प्रकाशकाधीन

वाचनालय क्र. ९५३८
९५।५।८३

स्वाध्यायमाला : पुष्प २०२ वे

प्रथम विभाग

भारतीय सण व उत्सव

# वैशाख मास

क्र. ९५३८ दिनांक ९५।५।८३

लेखिका

सौ. कुमुदिनी रांगणेकर,

मुंबई

★

BVBK-0401538

BVBK-0401538

किंमत ७५ पैसे

किंमत ५० पैसे

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २.

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ती पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळात वर्षात येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळा त्यांतील काही उत्सव घरी साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासही मुले जात. त्यामुळे भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणीच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनी सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचे सध्याचे घटते प्रमाण इ. मुळे तशी स्थिती राहिलेली नाही. छोटया-छोटया पुस्तिकांच्या वाचनाने ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीने आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधी प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नावाजलेल्या लेखिकेने आत्मीयतेने सोप्या भाषेत थोडक्यात पुष्कळ माहिती दिली आहे. बालकांना व प्रौढ साक्षरांना ही पुस्तके आवडतील असा आम्हांस भरवसा आहे.

### १. मालेतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाही आवश्यक असे ज्ञान या पुस्तकांच्या वाचनाने मिळते.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकात दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालये, संघ, दल या संस्थांची वाचनालये व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठी.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगी देण्यासाठी; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगी पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचे स्वरूप :

* सुसंस्कृत नागरिकास असे वाटत असते की, आपल्या सभोवतालच्या वस्तू (विमान, रेडिओ, विजेची शक्ती इ.), राजकारणातील चालू प्रश्न; थोर पूर्वजांची चरित्रे, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास यांची माहिती आपणास असावी. मालेसाठी विषय निवडताना वरील दृष्टी ठेविली आहे.
* शाळेत स्थूलमानाने ज्या विषयांचे शिक्षण होते त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीही या पुस्तकांतून असते.

  मनोरंजक पद्धतीने उपयुक्त विषयांचे ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणे हा मालेचा हेतू आहे.

म. ग्रं. सं. ठाणे ... ग्रंथालय शाखा
१४३५
१५/५/७

# वैशाख मास

चैत्र महिना संपला ! आता पुढला वैशाख महिना ! ह्या वैशाख महिन्यासंबंधी लहानपणी मी एक छान कविता ऐकली होती. तिचा कवी कोण ते मला ठाऊक नाही; पण ह्या दोन ओळी मात्र माझ्या मनावर बिंबल्या आहेत :–

वैशाखमासी प्रतिवर्षि येती । आकाशमार्गी नवमेघपंक्ती ।।
नेमेचि येतो मग पावसाळा । हे सृष्टिचे कौतुक जाण, बाळा ।।

हा वैशाख महिना सुरू झाला की दरवर्षी आकाशात नव्या ढगांच्या ओळी दिसू लागतात. आणि मग अगदी ठराविक पद्धतीने पावसाळा सुरू होतो ! खरंच, सृष्टीच्या ह्या नियमितपणाचे आपल्याला फार कौतुक वाटायला हवे !

पण नुसते कौतुक वाटून नाही भागणार ! सृष्टीच्या— निसर्गाच्या ह्या नियमितपणापासून आपण धडा घ्यायला हवा ! अन् आपल्या वागण्या-बोलण्यात असा नियमितपणा, अशी शिस्त राखायला हवी !

मोठ्या लोकांचे––ज्यांना महात्मा ही पदवी शोभते अशा माणसांचे––एक महत्त्वाचे लक्षण सांगितले आहे. त्यांच्या मनात

जे वाटते तेच त्यांच्या तोंडून उमटते नि तेच त्यांच्या कृतीत दिसते ! म्हणजे त्यांचे विचार, उच्चार व आचार ह्यांच्यांत पूर्ण एकी असते !

आणि ह्याच्या उलट जे दुरात्मे, बिन-किमतीचे असतात त्यांचे हे लक्षणही असेच उलट असते !

त्यांच्या मनात असते एक, ते तोंडाने बोलून दाखवितात दुसरेच आणि त्यांच्या कृतीमध्ये दिसून येते तिसरेच ! म्हणजे कशाचा कशास मेळ नाही ! सारी धरसोड ! सारा अनियमितपणा !

पण निसर्ग महात्मा आहे ! तो अत्यंत नियमितपणे वागतो ! आणि त्याची दूरदृष्टीसुद्धा असते ! कशी ती पहा हं !

पुढल्या ज्येष्ठापासून पाऊस सुरू व्हायचा. तर निसर्ग वैशाख महिन्यात त्याची आगाऊ तयारी करून ठेवतो.

तहान लागल्यावर विहीर खणणे शहाणपणाचे नसते ! निसर्गाचा सगळा कारभार कसा वेळापत्रकाप्रमाणे चालतो !

वेळापत्रक काही फक्त शाळेपुरतेच नसते. आपल्या वेळाचे व्यवस्थित वाटे करायला जे शिकविते ते वेळापत्रक ! तेव्हा शाळेतून घरी आल्यानंतरसुद्धा तुम्हांला वेगळे वेळापत्रक करता येईल. आणि त्यामुळे अभ्यास, खेळ, आईवडिलांचे काम, लहान भावंडांना सांभाळणे किंवा अभ्यासात मदत करणे असे वेळाचे वाटे करून वागता येईल.

सुट्टीचेसुद्धा वेळापत्रक करायला हवे ! शाळा उघडल्यानंतर होणाऱ्या अभ्यासाची सुट्टीत थोडी तोंडओळख करणे फार हिताचे ठरते. म्हणजे निसर्ग जसा वैशाख महिन्यात पावसाची तयारी करून ठेवतो तसेच होईल हे ! निसर्गाच्या शिस्तीपासून फार महत्त्वाचा धडा शिकल्यासारखे होईल.

उन्हाळ्यात किंवा हिवाळ्यात मुसळधार पाऊस पडेल का कधी ? छे: ! — अन् असा पडलाच तर केवढे घोटाळे होतील, नाही ? चक्क ऊन पडले आहे म्हणून आईने पापड, पापड्या, कुरडया, सांडगे करून वाळत घालावे आणि धो धो पाऊस पडावा, किंवा हिवाळ्यात कडाक्याची थंडी पडली असता मुसळधार पाऊस कोसळावा, की दातखीळ वाजविणारी हुडहुडीच भरेल ! भलताच गोंधळ होईल सगळा !

पण निसर्गाला आपली केवढी काळजी आहे ! तो असा बेताल वागत नाही. त्याची सगळी कामे कशी वेळच्या वेळी होतात. त्याच्या ह्या शिस्तीचे आपण कौतुक करायला हवे आणि अनुकरणही करायला हवे. आपल्याही वागण्या-बोलण्यात मेळ ठेवला पाहिजे.

वैशाख महिन्यात पावसाची पूर्वतयारी होत असते. आणि पावसाळा जवळ आला हे सुचविण्यासाठी वळीवाच्या पावसाच्या सरी मधूनच पडतात. ह्या पावसात घाटावरील प्रदेशात गारा पडतात. जणू त्यावेळी होणारा उकाडा कमी होण्यासाठी देवबाप्पा गमतीने बर्फाऐवजी गारा धाडतो !


कारण दोन महिन्यांचा एक ऋतू ह्या नियमाने चैत्र व वैशाख महिन्यात वसंत ऋतू असतो खरा; परंतु ज्येष्ठ-आषाढातील ग्रीष्म ऋतूचा उष्मा थोडा थोडा भासू लागतो वैशाखात. म्हणून तर ह्या सुमाराला—इंग्रजी मे महिन्यात—शाळांना उन्हाळ्याची सुट्टी मिळते.

**अक्षय्य-तृतीया**

आता वैशाख महिन्यातला पहिला सण म्हणजे वैशाख शुद्ध तृतीया ! हिला अक्षय्य-तृतीया म्हणतात ! आपल्याकडे साडेतीन मुहूर्तांतला अर्धा मुहूर्त आहे हा !

दर अमावास्येला समुद्राला भरती येते खरी; पण चैत्रातील अमावास्येनंतर येणाऱ्या अक्षय्य-तृतीयेची भरती फारच दांडगी असते असे ह्मणतात!

चैत्रात महिनाभर घरोघरी गौरीचे हळदीकुंकू होते. ह्या हळदकुंकू-समारंभाचा अक्षय्य-तृतीया हा शेवटचा दिवस असतो.



चैत्र शुद्ध तृतीयेला माहेरी गौरी महिनाभर राहून अक्षय्य-तृतीयेच्या दिवशी सासरी परत जाते असा समज आहे.

खेड्यांतील स्त्रिया हा अक्षय्य-तृतीयेचा सण मोठ्या थाटाने साजरा करतात. ह्याला अखिती म्हणतात ती माणसे. ह्या दिवशी गोडाधोडाचे जेवण ते जेवतात, ठेवणीतले कपडे वापरतात आणि शेतकरी लोकांच्या कामाला या अखितीपासून सुरुवात होते.

यावेळी शेतातील झुडपे तोडणे, काड्या काटक्या वेचणे, बी तयार करणे, शेत नांगरणे इत्यादी कामांचा प्रारंभ होतो. नांगरणी

नंतर पेरणी,लावणी वगैरे कामांची रांग चालू होते. शेतीची कामे अखंड चालू असतात. त्यांपासूनच आपल्याला धान्यधुन्य मिळते. तेव्हा अशा महत्त्वाच्या कामाला अखितीच्या मुहूर्तावर प्रारंभ करणे योग्यच आहे !

**परशुराम-जयंती**

ह्याच दिवशी परशुराम-जयंती असते ! आपण हिंदू लोक, देवाचे दहा अवतार मानतो. दशावतार म्हणतात ह्यांना.

मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण बुद्ध व कलंकी हे ते दहा अवतार !

पैकी चैत्रातील नवमीला रामजन्म होतो. आणि ह्या अक्षय्य-तृतीयेच्या दिवशी परशुराम-जयंती येते.

परशुराम हा देवाचा अवतार तर होताच. पण हनुमाना-प्रमाणे तोही शारीरिक बळाचे अधिदैवत होता. तो स्वतः मोठा पराक्रमी होता आणि मातृ-पितृ-भक्त होता.

परशुरामाच्या बापाचे नाव जमदग्नी व आईचे नाव रेणुका. जमदग्नी भयंकर रागीट होता. बापाचा हा "गुण" परशुरामाच्या अंगात उतरलाच होता. तोही तापट होता.

एकदा जमदग्नी रेणुकेवर चिडला व त्याने तिला ठार मारण्याची परशुरामाला आज्ञा केली. बापाची आज्ञा पाळण्यासाठी परशुरामाने आपल्या आईला ठार मारले. जमदग्नी त्यामुळे खूष झाला व त्याने परशुरामाला काय हवे ते मागण्यास सांगितले. त्याबरोबर आपल्या आईला जिवंत करण्याची विनंती परशुरामाने केली. अन् रेणुका परत जिवंत झाली. अशा रीतीने परशरामाने आपली मातृ-पितृ-भक्ती सिद्ध केली.

प्रातःकाळी सडा-संमार्जनाच्या वेळी खेडयांतल्या गृहिणी भक्तिभावाने परशुरामाला उद्देशून पुढील ओव्या म्हणतात—

अक्षय्य तृतीयेला। जन्मले परशुराम।
मातेला मारूनी। पुरविती पितृकाम।
एकवीस वेळा। निःक्षत्री केली धरणी
अद्‌भुत वाटे करणी। परशुरामाची ।।

आता पुढे ऐका परशुरामाची अद्‌भुत कहाणी. कार्तवीर्य सहस्रार्जुन नावाच्या एका क्षत्रिय राजाने जमदग्नीचा वध केला. त्यामुळे चिडून परशुरामाने पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची- पृथ्वीवर एकही क्षत्रीय जिवंत न ठेवण्याची- प्रतिज्ञा केली आणि ती बऱ्याच अंशी पार पाडली.

क्षत्रियांनी त्या काळी आपल्या सत्तेच्या जोरावर धुमाकूळ चालविला होता! असा सत्तेचा वाईट उपयोग केला म्हणजे नाश ठरलेलाच !

परशुरामाने क्षत्रियांच्या जुलुमापासून पृथ्वीचे संरक्षण केले.

आजकाल क्षत्रियांच्या जुलमाचे भय नाही. पण सर्व जगावर लष्करी जुलूम हात-पाय पसरू पहात आहे. सत्तेची हाव वाढल्या-मुळे जगात पुनः पुनः महायुद्धे होत आहेत. अणुबाँब, हायड्रोजन-बाँबचे शोध लावले जात आहेत. ह्यांच्या ऐवजी जगात शांतता, सुख आणि न्याय मिळावयास हवा, ह्यासाठी प्रत्येकाने झटले पाहिजे.

तेव्हा परशुरामाच्या चरित्रावरून आपण हा बोध घ्यावयाचा की, प्रत्येकाने शक्य तेवढी शक्ती वाढवावी. ह्या शक्तीच्या मदतीने

अन्याय दूर करता येतो. तेव्हा हे ध्येय ठेवूनच शक्ती वाढवावी. मात्र त्या शक्तीचा गैर उपयोग करू नये.

परशुरामाला आपल्या शक्तीचा गर्व चढला होता. एखाद्या पिसाटासारखा तो हात धुवून क्षत्रियांच्या मागे लागला. ह्याचा परिणाम असा झाला की, पृथ्वीचे पालन व रक्षण करावयास एकही क्षत्रिय जाग्यावर उरला नाही. तेव्हा भीतीने रानावनात पळून गेलेल्या क्षत्रियांना काश्यपमुनींनी परत बोलाविले आणि पुन: "येरे माझ्या मागल्या" होऊ नये म्हणून त्यांनी परशुरामालाच पृथ्वी सोडून जाण्याची आज्ञा केली. तेव्हापासून परशुराम महेंद्र पर्वतावर राहू लागला. जातीने ब्राह्मण असणाऱ्या परशुरामाने हातात परशु–कुऱ्हाडीसारखे हत्यार–घेऊन आपल्या शक्तीचा वाईट उपयोग केल्यामुळे त्याच्यावर हा कटू प्रसंग ओढवला.

**सीतानवमी**

वैशाख शुद्ध नवमीला बंगालमध्ये सीतानवमी म्हणतात. ह्या दिवशी जमीन नांगरताना सीतादेवी सापडली असे ते लोक मानतात. म्हणून ह्या दिवशी भूदान—जमिनीचे दान—केल्याने पुण्य लागते अशी कल्पना आहे त्यांची !

विनोबाजी भावे यांच्या भूदान-यज्ञाच्या संकल्पाला ही कल्पना मदतच करील ! मोरोपंत कवींनी आपल्या सीतागीतात वर्णन केले आहे की—

> यज्ञासाठी भूमी । नांगरिता धन्या ।
> सापडली कन्या । सीतादेवी ॥

आपल्या महाराष्ट्रात ह्या ओळी म्हटल्या जातात. चैत्र महिन्यातील रामनवमीच्या निमित्ताने सीतादेवीची योग्यताही

आपल्याला कळून आली आहे, अन् तरीही आपण ही सीतानवमी पाळीत नाही ! बंगाली लोकांचे पाहून आपण ही चूक सुधारायला हवी !

ह्यानंतर वैशाख शुद्ध दशमीला शंकराचार्यांची जयंती येते. श्रीमंत-गरीब, ब्राह्मण-हरिजन असा फरक मानू नये, असे त्यांनी शिकविले. आपल्या हिंदू धर्मात अनेक जाती असल्यामुळे त्यांच्यांत हेवेदावे लागतात. अन् मग तू लहान, मी मोठा अशी भांडणे होतात. अशा वेळी शंकराचार्यांचा उपदेश आपण लक्षात ठेवावा आणि आपण सारे एक आहोत ही भावना धरावी. म्हणजे आपल्यामधील एकी वाढेल ! अशी एकी असली की आपली शक्ती, अन् आपले बळ वाढते. ह्या एकीच्या जोरावरच शिवाजी-महाराजांनी स्वराज्य स्थापले ! आणि ही एकी नाहीशी झाली, फंदफितुरी माजली म्हणूनच स्वराज्य नष्ट झाले ! पुढे पेशवाईही नष्ट पावली ! एवढे महत्त्व एकीचे आहे.

**नारसिंह-जयंती**

त्यानंतर वैशाख शुद्ध चतुर्दशीला **नृसिंह** ऊर्फ **नारसिंह-जयंती** येते. भक्त प्रल्हादाची गोष्ट ठाऊक आहे का तुम्हांला ?

हिरण्यकश्यपू नावाच्या राक्षसाच्या पोटी विष्णुभक्त प्रल्हादाचा जन्म झाला ! प्रल्हाद सतत विष्णूची भक्ती करी. त्याच्या बापाला ते आवडेना. त्याने प्रल्हादाचा नाना रीतींनी छळ केला. पण प्रल्हाद विष्णूचे भजन-पूजन सोडीच ना.

एकदा हिरण्यकश्यपू रागाने त्याला म्हणाला— "तुझा विष्णू जगात सगळीकडे आहे म्हणतोस ना तू ? मग ह्या समोरच्या खांबात नाही तो कुठे दिसत ?"

म्हटले आहे. म्हणजे दामाजीने लोकांना धान्य लुटू दिले. नि त्याची रसीद–पावती–देवाने दिली. भक्ताला मदत करण्यासाठी देव महार झाला! हरी हरिजन झाला ! देवाला ह्यात कमीपणा वाटला नाही ! मग आपण एकमेकांना कमी लेखणे चुकीचे नाही का ? देवाच्या दृष्टीने आपण सर्व सारखे आहोत. तो हेच वेगवेगळ्या रीतीने शिकवीत असतो आपल्याला.

**शंकराचार्यांची जयंती**

शंकराचार्यांनी सुद्धा हेच शिकविले. आपल्या वागणुकीत त्यांनी हेच दाखविले. त्यांचे एकंदर आयुष्यच अजब आहे!

हिंदुधर्माप्रमाणे पुरुषजातीला चार आश्रम–आयुष्याचे चार भाग–– नेमून दिले आहेत. पहिला ब्रह्मचर्याश्रम. ह्या भागात शिक्षण घ्यावयाचे.

दुसरा गृहस्थाश्रम. ह्या भागात विवाह करून संसार चालवावयाचा. गृहस्थ व्हावयाचे. गृहस्थ ह्या शब्दाचा मूळ अर्थ गृहात म्हणजे घरात राहतो, असा आहे. घरात रहाणे म्हणजे संसाराची जबाबदारी घेणे. तेव्हा गृहस्थ ही जबाबदार व्यक्ती असते; पण आजकाल आपण माणूस ह्या अर्थी सर्रास हा शब्द वापरतो.

ह्यानंतरचा तिसरा आश्रम म्हणजे वानप्रस्थाश्रम. हळूहळू संसारातील मन काढून घ्यावयाचे. मुलाबाळांच्या अंगावर जबाबदाऱ्या टाकायच्या आणि रानावनात हिंडून ईश्वराचे चिंतन करीत आयुष्य घालवावयाचे. परंतु संसाराचा संबंध अजिबात सुटत नाही ह्या आश्रमात.

शेवटच्या संन्यासाश्रमात मात्र संसाराचा संबंध पार सोडायचा! बायकोमुलांचे नाते तोडायचे. जगातील इतर लोकांसारखी व त्यांच्यावर असते तेवढीच आपुलकी नातलगांबद्दल मानायची!

अशा रीतीने टप्प्याटप्प्याने संन्यास घ्यावयाचा असतो. पण शंकराचार्य साधे मनुष्य का होते? मोठ्यांचे सारेच मोठे!

ब्रह्मचर्याश्रमातून सरळ शेवटल्या संन्यासाश्रमात उडी मारू पहात होते ते! संसाराचा डाव मांडणेही नको! नि तो सोडून जाणेही नको! बस्स! लग्नच करायचे नाही!

पण त्यांच्या विधवा आईला हे पटेना. श्रीशंकराच्या कृपेने हा एकुलता एक मुलगा झालेला. त्यातून तो कमालीचा हुषार! एकपाठी होते शंकराचार्य! एकदा गुरूंनी शिकविले की ह्यांचे पाठ झालेच!


अन् असा सोन्यासारखा मुलगा लग्नकार्य न करता संन्यासी होणार! आई काही या गोष्टीला परवानगी देईना.

शेवटी एक आश्चर्यकारक गोष्ट घडली. नि आईने त्यांना परवानगी दिली.

एके दिवशी पहाटे नेहमीप्रमाणे शंकराचार्य पूर्णा नदीवर आंघोळीला गेले होते. अन् नदीतील मगरीने त्यांचा पाय पकडला. ही बातमी श्रीअंबिकेच्या— शंकराचार्यांच्या आईच्या— कानावर आली. तशी ती धावत-पळत नदीच्या काठावर आली. नि बापडी रडू लागली.

शंकराचार्य म्हणाले— "आई, ही मगर मला सोडत नाही; पण संन्यास घेण्याची परवानगी तू देत असशील तर कदाचित ही सोडील."

प्रल्हादाने शांतपणे उत्तर दिले-- "त्या खांबामध्येही माझा विष्णू आहे ! "



हे ऐकताच हिरण्यकश्यपूने रागाच्या भरात खांबावर लाथ मारली. कडकड आवाज होऊन खांब मोडला. आणि त्यातून अर्धा सिंह व अर्धा मनुष्य अशी नृसिंहाची आकृती बाहेर आली अन् तिने हिरण्यकश्यपूला मारले.

**वामनपंडित-पुण्यतिथी**

हयाच वैशाख महिन्यात वैशाख शुद्ध षष्ठीला वामन पंडित हया सुप्रसिद्ध कवीची पुण्यतिथी येते. पुण्यतिथी म्हणजे ज्या दिवशी मृत्यू झाला ती तिथी !

आणि ह्याच वामन पंडिताने नृसिंहाची वरील कथा काव्यात सांगितली असून पुढील श्लोकात त्याने खांब मोडलेल्या प्रसंगाचे वर्णन केले आहे.

**स्तंभ तो अवचिताचि कडाडी । अब्जजांड अवघेचि कडाडी ।।**
**अब्जजादिहृदयांत धडाडी । काल-मेघ-शत-नाद गडाडी ।।**

वामनपंडिताला रामदास यमक्या वामन म्हणत. कारण त्याला यमक जुळवून कविता करण्याचा नाद होता. वर दिलेल्या ओळीत कडाडी, धडाडी, गडाडी ह्या सारख्या उच्चाराच्या शब्दांनी यमक साधले आहे; पण वामनपंडिताच्या कविता मोठ्या रसाळ असत. अन् म्हणूनच तुकाराम, ज्ञानेश्वर व मोरोपंत ह्या सुप्रसिद्ध कवींच्या पंक्तीला त्याला बसविणारी खालील आर्या अनेकांच्या तोंडात घोळते :—

**सुश्लोक वामनाचा अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।**
**ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंतांची ।।**

तेव्हा वामन पंडिताच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्याच्या काव्याचा अभ्यास केला तर एकात दोन कामे साधली जातील ! त्या जुन्या, थोर कवीची पुण्यतिथी साजरी होईल. आणि आपल्या कवितांचा खजिना अधिक वाढेल ! मित्रांबरोबर किंवा भांवडांबरोबर कवितांच्या भेंड्या लावताना त्यांना जिंकणे सोपे होईल ! —अन् अशा रीतीने पाठान्तर भरपूर झाले, पुष्कळ कविता वारंवार पाठ केल्या नि म्हटल्या की, स्मरणशक्ती आपोआप वाढते ! म्हणजे एकात तीन कामे होतील बघता बघता !

**बुद्ध-जयन्ती**

ह्या वैशाख मासात बुद्ध-जयन्ती साजरी होते. गौतम-बुद्धांनी बौद्ध धर्म स्थापन केला.

बौद्ध धर्माच्या अनुयायांनी ठिकठिकाणी डोंगर पोखरून कोरीव लेणी तयार केली. वेरूळ, कार्ले इत्यादी ठिकाणची लेणी प्रसिद्ध आहेत.

बुद्ध-जयन्तीच्या निमित्ताने ही लेणी पहाण्याची सफर अवश्य काढावी. त्यामुळे आपले जुने कलाकौशल्य नजरेला पडेल. कारागिरांची धर्मनिष्ठा पाहून आनंदही होईल. ह्या दिवशी बुद्ध-चरित्राचाही अभ्यास करावा.

**दामाजीपंतांची पुण्यतिथी**

वैशाख शुद्ध द्वादशीला दामाजीपंतांची पुण्यतिथी येते.


दामाजीपंत हा मंगळवेढे गावाचा महालकरी होता. संसारी माणूस असूनही तो मोठा देवभक्त होता. आपण सारी एकाच देवाची लेकरे आहोत असे त्याला वाटे. तो हे बोलूनही दाखवी. आणि तो वागेसुद्धा तसाच ! म्हणजे तो महात्मा होता असे म्हणायला हरकत नाही.

एकदा मंगळवेढे गावी फार मोठा दुष्काळ पडला. दामाजीपंताने आपल्या घरातील धान्य भुकेल्या गावकऱ्यांना मोठ्या प्रेमाने दिले. पण तेवढ्याने काय होणार ! आभाळालाच भोक पडले तर ठिगळ कसे लावणार?

गावातील धान्याची सरकारी कोठारे पंतांच्या ताब्यात होती. पंतांच्या मनात आले, “ प्रजेकडून घेतलेल्या धान्याने ही कोठारे भरली आहेत. तेव्हा राजाप्रमाणे प्रजेचाही त्यांच्यावर हक्क आहे ! व ह्या कोठारांतील धान्य अशा प्रसंगी प्रजेला देणे हे राजाचे कर्तव्य आहे आणि राजाचा नोकर म्हणून आपण हे कर्तव्य करावयास हवे.”

असा विचार करून पंतांनी ती कोठारे लोकांना उघडून दिली. पुढे ह्याचा जाब विचारण्यासाठी सरकारी अधिकारी धावून आले. पंतांनी सर्व जबाबदारी स्वत:वर घेतली. त्यांना पकडून बेदरच्या बादशहाकडे नेण्यात आले.

पंतांवर– आपल्या भक्तावर– आलेले हे संकट दूर करण्यासाठी पंढरीचा विठोबा विठू महार झाला. पंतांना दरबारात हजर करण्याआधी तो स्वत: पंतांचा नोकर म्हणून दरबारात आला. त्याने आपल्या घोंगडीच्या आत ठेवलेली पिशवी बाहेर काढली,



व धान्याची पुरी किंमत बादशाहाला देऊन टाकली. त्यावेळी क्षणभर विठू महाराच्या जागी बादशहाला विठोबाची किरीटकुंडलांनीं सजलेली मूर्ती दिसली ! अन त्याला त्या विठू महाराचे जणू वेड लागले ! पण विठू महार केव्हाच दिसेनासा झाला होता.

अमृतराय नावाच्या एका कवीने एक सुंदर गाणे केले आहे. देवाने आपल्या भक्तांसाठी किती त्रास घेतला त्याचे वर्णन त्यात आहे. ह्या प्रसंगाबद्दल ‘ दामाजीची रसीद पटविली ’ असे कवीने

त्यांच्या प्रेमळ आईने चटकन परवानगी दिली. आणि आश्चर्य असे की, मगरीने लगेच त्यांचा पाय सोडला !

पुढे त्यांनी संन्यास घेतला. जगन्नाथपुरी, बदरीनारायण, द्वारका आणि शृंगेरी ह्या चार कोपऱ्यांतील चार शहरी त्यांनी मठ



स्थापन केले व काशीच्या विद्वान पंडितांनाही त्यांनी वादविवादात जिंकले. ही झाली बुद्धीची कामे. पण ह्याखेरीज त्यांनी फार महत्त्वाचे असे आणखी एक काम केले. आणि त्यामुळे त्यांच्या हृदयाचा प्रेमळपणा दिसून आला. नरमेध करण्याची घातकी रूढी त्यांनी बंद पाडली.

नरमेध म्हणजे यज्ञात पशूचा बळी देतात तसा माणसाचा बळी देणे ! केवढा क्रूरपणा ! पण पूर्वीपासून चालत आलेली रूढी म्हणून ती चालू ठेवली होती लोकांनी ! शंकराचार्यांना ते आवडेना ! माणसाने माणसाला मारायचे ? छेः ! आपण सारे भाऊ, भाऊ आहोत !

त्यावेळेपासून ही दुष्ट रूढी—ही क्रूर पद्धत—नाहीशी झाली! त्यांच्या हया कृतीमुळे त्यांच्याबद्दल लोकांना अधिकच आदर वाटू लागला!

अन् वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी त्यांनी बदरीकेदार येथे समाधी घेतली.

**चोखामेळा पुण्यतिथी**

आता वैशाख महिन्यातील अशीच महत्त्वाची तिथी वैशाख वद्य त्रयोदशी! चोखामेळयाची पुण्यतिथी आहे ही!

चोखामेळा जातीने महार!—हरिजन! एकदा मंगळवेढे गावाच्या भोवती तटाच्या भिंती बांधण्याचे काम निघाले. बादशहाने गरीब हरिजनांना वेठीस धरण्याची आज्ञा केली. म्हणजे त्यांनी गावातील रस्त्यावरून चोरासारखे चालावयाचे. गावाबाहेरील उकिरडयावर रहावयाचे. आणि त्यांना गावातून हद्दपार करणाऱ्या—दूर लोटणाऱ्या–भिंतीसुद्धा त्या हरिजनांनीच बांधावयाच्या! हंऽ!

अन् ही भिंत बांधताना गवंडयांनी गोंधळ केला, किंवा भिस्त्याने पाणी अधिक ओतल्यामुळे चिखल पातळ झाला, किंवा अधिकाऱ्यांनी घाई केली; कोणत्याही कारणाने असो; पण बांधता, बांधता भिंत कोसळली आणि हरिजनांची एक तुकडी त्या भिंतीखाली गेली. त्यातच चोखोबाही होता.

चार लोक हळहळले. पण त्या मरणाऱ्या लोकांना त्यांनी त्या ढिगाखालीच मरू दिले! त्या मातीखाली त्यांची प्रेते कुजली. हीच मूठमाती मिळाली त्यांना! पुढे चोखोबाचे अभंग वाचून नामदेव नावाच्या संताला खेद वाटला. तो मंगळवेढयाला आला. त्याने तो मातीचा ढीग खणावयास सुरुवात

केली. त्याला कितीतरी हाडे सापडली. प्रत्येक हाड घेऊन तो कानाशी लावी. आणि ज्या हाडामधून 'विठ्ठलऽविठ्ठल' असा आवाज येई ते चोखोबाचे म्हणून वेगळे काढी. अशा रीतीने त्याने सर्व हाडे शोधून काढली व त्यांवर समाधी बांधली.

चोखोबाने आपल्या ह्यातीत सुरेख अभंग रचले होते. हरिजन असून त्याची वाणी शुद्ध मराठी होती. त्याचे अभंग करुणरसाने थबथबले आहेत, जातिभेदापायी होणाऱ्या जुलुमामुळे वैतागले आहेत; पण ईश्वराच्या प्रेमळपणावर विश्वास ठेवणारे आहेत.

'ऊस डोंगा परी, रस नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया सोंगा ॥

हा चोखोबाचा अभंग फार प्रसिद्ध आहे,

चोखोबा म्हणतो— ऊस डोंगा असेल. दिसावयाला खडबडीत व वाईट असेल; पण आतला रस डोंगा नसतो ना ? तो मधुर असतो ना ? मग वरच्या सोंगाला का महत्त्व द्यावयाचे ?

आपण अनेकदा बाहेरच्या भपक्याला भुलतो नि त्यामुळे फसगत होते आपली. 'दिसते तसे नसते नि म्हणूनच जग फसते' अशी म्हणच आहे ना?

**मल्हारराव होळकर पुण्यतिथी**

इंदूरचे राज्य ह्याने स्थापन केले. हा जातीने धनगर असून पुणे जिल्ह्यातील होळ गावचा राहाणारा. तेथून तो खानदेशात आपल्या मामाच्या गावी गेला. पुढे बाजीराव पेशव्यांनी त्याला साधारण शिपाई म्हणून सैन्यात घेतला. पण आपल्या अंगातील हुषारीने हा चढत गेला.

पेशव्यांच्या वतीने त्याने रोहिल्यांचा पराभव केला. त्यामुळे मराठ्यांचा मान वाढला. आणि दिल्लीतील मोगल बादशहाला मराठ्यांचा वचक वाटू लगला.

त्याच्या मुलाचे नाव खंडेराव. सुप्रसिद्ध अहिल्याबाई होळकर ही खंडेरावाची बायको व मल्हाररावाची सून !

पानिपतच्या लढाईत मल्हारराव हजर होता. पण शेवटी पळापळ झाली. आणि पेशव्यांची बायकामुले सुरक्षित नेण्याचे जबाबदारीचे काम ह्याच्यावर सोपविले होते. त्याने इंदूरला स्थापन केलेले राज्य पुढे अहिल्याबाईने चांगले नावारूपाला आणले. वैशाख शुद्ध एकादशीला मल्हारराव होळकर मरण पावले.

**राम गणेश गडकरी-जयन्ती**

ह्याच वैशाख महिन्यात महाराष्ट्रातील एका थोर कवीचा जन्म झाला. त्याचे नाव राम गणेश गडकरी.

त्यांच्या कवितांचा संग्रह त्यांच्या मरणानंतर छापण्यात आला. त्या संग्रहाचे नाव 'वाग्वैजयंती' असे आहे. ते 'गोविंदाग्रज' ह्या नावाने कविता लिहीत असत. त्यांच्या कवितांपैकी 'राजहंस माझा निजला' ही कविता फार प्रसिद्ध आहे. ते करुण प्रसंग उत्तम रंगवीत नि विनोदही छान लिहीत. त्याचप्रमाणे ते गंभीर लिखाणही करीत. 'राजहंस माझा निजला' ही करुण कविता आहे आणि त्यांची 'श्रीमहाराष्ट्र गीत' ही कविता गंभीर असून मोठी सुंदर व स्फूर्तिदायक आहे.

गडकरी कवी होते आणि नाटककारही होते. त्यांनी सात नाटके लिहिली. त्या सर्वांत त्यांचे 'एकच प्याला' नाटक विशेष

गाजले. हे नाटक पहाताना प्रेक्षक खळखळ अश्रू गाळतात; तर त्यांचे ' भावबंधन ' नाटक पहाताना प्रेक्षक खदखदून हसतात. ही दोन्ही नाटके अजून लोकप्रिय आहेत.



राम गणेश गडकरी

गडकऱ्यांची भाषा कधी कधी समजावयाला थोडी अवघड वाटते. परंतु ती नेहमीच कानाला मोठी डौलदार लागते. ते विनोदी कोटया करीत असत; आणि पुष्कळ लेखकांनी त्यांच्या लिहिण्याच्या शैलीचे— पद्धतीचे— गेल्या चाळीस वर्षांत अनुकरण केले आहे. ते लेखक मोठया आवडीने स्वतःला गडकरी-भक्त म्हणतात. ह्यावरून गडकरी किती थोर लेखक होते हे कळून येते.

गडकऱ्यांच्या काही कविता विनोदी आहेत. आणि भावबंधन नाटकात इंदू, बिंदू व कामण्णा ह्या पात्रांचा मजेशीर विनोद आहे. प्रेमसंन्यास नाटकातील विसरभोळया गोकूळचे पात्र म्हणजे मूर्तिमंत विनोद. आणि पुण्यप्रभाव नाटकामध्ये कंकण, किंकिणी व नूपुर ह्या तिघांभोवतीचा विनोदही गंमतीचा आहे.

पण ह्याशिवाय गडकऱ्यांनी ' बाळकराम ' हे टोपणनाव घेऊन काही खास विनोदी लिखाण लिहिलेले आहे. ते ' रिकामपणची कामगिरी ' ह्या पुस्तकात एकत्र छापले आहे.

एवढे सर्व लिखाण गडकऱ्यांनी अवघ्या नऊ वर्षांत केले. दुर्दैवाने ते वयाच्या चौतिसाव्या वर्षी—सन १९१९ मध्ये—वारले.

त्यामुळे त्यांच्या हयातीत त्यांच्या गुणांचा योग्य गौरव होऊ शकला नाही. पण महाराष्ट्रातील गावोगावी त्यांचा स्मृतिदिन अजून पाळला जातो. गडकऱ्यांशिवाय दुसऱ्या कोणत्याही मराठी लेखकाच्या वाट्याला हे भाग्य आलेले नाही ! गडकरी लौकर मेले; पण 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' ही रामदासांची उक्ती त्यांनी खरी केली.

मरणाच्या अर्धा तासच आधी त्यांनी भावबंधन नाटकाचा शेवटचा प्रवेश पुरा करून लेखणी खाली ठेवली होती !

अशा ह्या थोर नाटककार व कवीचे आपण ह्या वैशाख महिन्यात आदराने स्मरण करू या. ह्या महिन्यात त्यांचे थोडेतरी लिखाण प्रत्येकाने वाचावे आणि त्यांचे 'श्रीमहाराष्ट्र-गीत' पाठ करावे. म्हणजे त्यांनी मराठी भाषेवर केलेल्या उपकारांची थोडी फेड होईल !

**बालकवी-पुण्यतिथी**

आता ह्याच वैशाखमासात मरण पावलेल्या दुसऱ्या एका थोर कवीची माहिती ऐका. ह्या कवीचे नाव त्र्यंबक बापूजी ठोमरे. परंतु ते **बालकवी** ह्या नावाने प्रसिद्ध आहेत.

१९०७ साली जळगावला महाराष्ट्रातील कवींचे संमेलन भरले होते. जुने सुप्रसिद्ध कवी कर्नल कीर्तिकर अध्यक्ष होते. महाराष्ट्रातील मुख्य, मुख्य कवी हजर होते. त्यांनी आपापल्या कविता म्हणून दाखविल्या. आणि नंतर सतरा वर्षांचे ठोमरे व्यासपीठावर चढले आणि त्यांनी मोठ्या धिटाईने आपण रचलेल्या कविता म्हटल्या.

श्रोते चकित झाले. अध्यक्ष भारी खूष झाले. नि त्यांनी त्याला **बालकवी** ही पदवी दिली, आणि ह्या नव्या नावानेच ते प्रसिद्धी पावले.


बालकवी

बालकवींची वृत्तीही बालासारखीच साधी होती. त्यांचा स्वभाव मनमोकळा व निष्कपटी होता. आणि कधी कधी लहान मुलासारखेच ते एकदम चिडत नि लगेच थंड होत.

बालकवींना आपल्या कविमित्रांबद्दल फार जिव्हाळा वाटे. गडकरी व ते एकमेकांना वारंवार भेटत. एकमेकांचे लिखाण एकमेकांना वाचून दाखवीत. गडकऱ्यांना बालकवींच्या कविता फार आवडत आणि बालकवींना गडकऱ्यांची नाटके भारी आवडत.

बालकवींना **निसर्गाचे कवी** म्हणत. त्यांना सृष्टी, पाणी, चंद्रप्रकाश फार प्रिय वाटत. ‘ फुलराणी ’, ‘ अरुण ’, ‘ निर्झरास ’ व ‘आनंदी आनंद गडे’ ह्या त्यांच्या कविता लोकप्रिय आहेत. ‘आनंदी आनंद गडे’ ह्या कवितेत तर बालकवींनी निसर्गाचे भारी सुरस वर्णन केले आहे.

सोनेरी सूर्यकिरण, निळेभोर आकाश, वहाणारा झरा वगैरे निसर्गाच्या प्रत्येक गोष्टीत कवीला आनंद भरलेला आढळतो अन् ते वाचताना आपले मनही आनंदित होते.

आनंदी आनंद गडे ।
इकडे तिकडे चोहिकडे ॥

पण निसर्गावर प्रेम करणाऱ्या बालकवींना मृत्यू मात्र अनैसर्गिक आला. अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्षी अपघाती मरण आले त्यांना. आगगाडीचे रूळ ओलांडताना पाय अडखळून ते खाली पडले. त्याच वेळी मागून मालगाडी आली आणि त्यांच्या अंगावरून गेली !

ऐन तारुण्यात बालकवी मरण पावले ! पण कीर्ती आयुष्याच्या लांबीवर अवलंबून नसते ! आयुष्यातील कर्तृत्वावर ती अवलंबून असते. बालकवींनी अवघ्या अठ्ठावीस वर्षांत अपार कर्तृत्व केले नि त्यांची कीर्ती अजरामर झाली ! त्यांच्या काव्याच्या रूपाने ते चिरंजीव झाले. मराठी भाषा जिवंत असेपर्यंत त्यांची कीर्ती कायम राहील.

**आधुनिक काळातील वैशाखाचे महत्त्व**

आता वैशाख महिन्याच्या वेगळ्या महत्त्वाच्या बाजू बघू या हं. ह्या महिन्यात उन्हाळ्याची सुट्टी असते. नि सुट्टीत गावाला जातात बहुधा. कोणी आजोळी जातात, कोणी काकाकडे, कोणी स्नेही मंडळीकडे आणि कोणी भाड्याने बंगला घेऊन महाबळेश्वर, माथेरान, उटकमंड, दार्जिलिंग, खंडाळे, लोणावळे ह्या ठिकाणी जातात.

मिळून काय, वैशाखात हवापालट मिळते. जी माणसे ह्या दिवसात परगावी जात नाहीत त्यांच्याकडे परगावाहून पाहुणे येतात, नि हवापालट न मिळाला तरी थोडा थारेपालट होतो त्यांना.

ज्यांचे आजोळ कोकणात असते त्यांची ह्या दिवसात मोठी चंगळ होते. आंबे, फणस, काजू ह्यांची रेलचेल असते. नंतर आंबेपोळ्या नि फणसपोळ्याही मिळतात.

एकंदरीत वर्षभरात केलेल्या श्रमांची झीज भरून निघते ह्या महिन्यात. फुलांचीही रेलचेल असते हं. मोगरी नि सुरंगी ह्या सुवासिक फुलांना बहर येतो !

ह्याच महिन्यात लग्नांचा मोसमही प्रथम सुरू होतो. आपल्या नात्यातच लग्न निघाले म्हणजे धांदल विचारूच नका पण एरवीही रस्त्यावरून शृंगारलेल्या मोटारीतून वरात जाताना पहावयाला मौज वाटते. ती रोषणाई नि ते दारूकाम ! खरं ना ? तेव्हा अशा अनेक प्रकारे वैशाख महिन्याचे महत्त्व पटते.

## स्वाध्याय

(१) नारसिंहाने हिरण्यकश्यपूला का ठार मारले ?

(२) विठू महाराने दामाजीची 'रसीद' कशी पटविली ?

(३) श्रीमत् शंकराचार्यांनी संन्यास घेण्यासाठी आईची परवानगी कशी मिळविली ?

(४) परशुरामाच्या चरित्रावरून तुम्ही काय बोध घ्याल ?

(५) खालील व्यक्तींबद्दल माहिती द्या :—
(अ) राम गणेश गडकरी, (ब) बालकवी, (क) चोखामेळा.

बा. क्र. 9435
दिनांक 14/9/0
BVBK-0401538